सायं.दैनिक
बीड
# प्रारंभ
Email-prarambh2023@gmail.com
संपादक-जालिंदर ज्ञानदेव धांडे
बीड (महाराष्ट्र) ■ वर्ष ५ वे ■ अंक ६५ मंगळवार दि. २९ एप्रिल २०२५ RNI MAHMAR/2021/81481 किंमत ३ रुपये ■पाने-४

## दुष्काळात तेरावा... बीडमध्ये आता पाण्याची चोरी, वृद्ध दाम्पत्याच्या विहिरीतील अडीच परस पाणी पळवल

बीड । प्रतिनिधी

उन्हाळ्याची सुरुवात झाल्यानंतर राज्यातील अनेक जिल्ह्यात पाणीटंचाईने नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. पाण्यासाठी मैल न मैल भटकंती होत असून हंडाभर पाणी मिळवण्यासाठी महिला जीवावर उदार झाल्याचं नाशिकमधील व्हायरल झालेल्या एका व्हिडिओतून आपण पाहिलं होत. मराठवाड्यातही पाण्यासाठी भीषण परिस्थितीला नागरिकांना सामोरे जावे लागत आहे. त्यातूनच, बीड तालुक्यातील साक्षाळ पिंपरी गावात विहिरीतील पाणी चोरीला गेल्याची घटना समोर आली आहे. आधीच पाणीटंचाईने शेतकरी त्रस्त असताना वयोवृद्ध काशीद दांपत्य या प्रकारामुळे हतबल झाले आहे.

बीड तालुक्यातील साक्षाळ पिंपरी गावात त्रिंबक काशीद आणि त्यांची पत्नी रंभा काशीद शेती करून आपला उदरनिर्वाह करतात. मात्र, रात्रीतून अज्ञातांनी विहिरीतील पाणी टँकरमध्ये लंपास केले आहे. सकाळी फळबागेला पाणी देण्यासाठी हे दांपत्य आले असता विहिरीत पाणीच नसल्याने पाणीचोरीचा हा प्रकार उघड झाला आहे. विहिरीत अडीच परस पाणी साचवून ठेवलं होतं, पण कुणीतीर मोटार चालू करून, लॉक तोडून हे पाणी चोरी करण्यात आल्याने वृद्ध शेतकऱ्याने संताप व्यक्त केला आहे. विहिरीतून २-३ टँकर भरुन पाणी नेलं आणि बाकी पाणी सोडून दिलं, असेही त्र्यंबक काशीद यांनी बोलताना सांगितले.

# राज्यात नवीन इलेक्ट्रिक वाहन धोरण, टोल नाक्यावर सूट देणार, सुधारित पीक विमा लागू करणार; राज्य मंत्रिमंडळाचे मोठे निर्णय

**प्रारंभ । वृत्तसेवा**

**मुंबई : राज्यात यापुढे सुधारित पीक विमा योजना लागू करण्यात येणार आहे. तसेच इलेक्ट्रिक वाहनांच्या खरेदीमध्येही आणि टोलमध्येही सूट देण्याचा विचार राज्य सरकार करत आहे अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. तसेच राज्यातील जहाज निर्मितीलाही प्रोत्साहन देण्याचा निर्णय राज्याच्या मंत्रिमंडळात घेण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली. राज्य मंत्रिमंडळामध्ये काही महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्याची माहिती दिली. पहलगाम हल्ल्यामध्ये मृत्युमुखी पडलेल्या राज्यातील व्यक्तींच्या कुटुंबाला प्रत्येकी ५० लाखांची मदत करण्यात येणार आहे. त्यांच्या शिक्षणाचा प्रश्न सोडवण्याचा आणि त्यांच्या कुटुंबातील एकाला शासकीय नोकरी देणे हा निर्णय राज्य मंत्रिमंडळाने घेतला आहे.**

इलेक्ट्रिक व्हेईकल पॉलिसी

राज्य सरकारने एक नव्या इलेक्टिक व्हेईकल पॉलिसीचा निर्णय घेतला आहे. त्यामध्ये चार्जिंग स्टेशन्सची सुविधा वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. इलेक्ट्रिक व्हेईकल्सच्या खरेदीवर सबसिडी आणि काही प्रमाणात टोलवरही सूट देण्यात येणार आहे.

शिप ब्रेकिंग, शिप बिल्डिंग वाढवण्यात येणार आहे. त्यातून रोजगार निर्मिती होते. राज्यात तीन मोठे बंदर आहेत. त्यातून व्यवसाय निर्माण होऊ शकते. त्या मुद्द्यावर एक पॉलिसी करण्यात आली आहे.

सुधारित पीक विमा योजना लागू करणार

राज्यात सुधारित पीक विमा योजना लागू करण्यात येणार आहे. १ रुपयात विमा योजनेत



लाखो बोगस अर्ज आले. लोकांनी निधीचा अपव्यय करणारे षडयंत्र केले. त्यामुळे गरजू व्यक्ती या योजनेपासून वंचित राहू नये म्हणून सुधारित योजना आणणार आहे. विमा कंपन्यांचा नव्हे तर शेतकऱ्यांचा लाभ व्हायला हवा.

शेतकऱ्यांना मल्चिंग पेपर, ट्रॅक्टर, ट्रीप यामध्ये गुंतवणूक करणारी नवी योजना लागू केलेली आहे.

आज ९ साईट्सवर पंप स्टोअरेजचे करार केले आहे. त्यामाध्यमातून ८००० ते ८५०० मेगावॅट वीज निर्मिती होणार आहे. पंप स्टोरेजच्या क्षेत्रात जास्त निर्मिती करणारे राज्य महाराष्ट्र आहे.

इतर महत्त्वाचे निर्णय

१. टेमघर प्रकल्प, ता. मुळशी, जि. पुणे येथील उर्वरित कामे व धरण गळती प्रतिबंधक कामासाठी रु.४८८.५३ कोटी किमतीच्या सुधारित खर्चाला प्रशासकीय मान्यता. (जलसंपदा) २. मुंबई भिक्षा प्रतिबंध अधिनियम,

## लोकाभिमूख व गतिमान अभियान राबवावे

### १०० दिवसाच्या कार्यालयीन सुधारणा बैठकीत जिल्हाधिकारी विवेक जान्सन यांचे आवाहन

बीड । प्रतिनिधी

१०० दिवसाच्या कार्यक्रमात जिल्हयातील प्रत्येक अधिका-यांनी नाविण्यपूर्ण,लोकाभिमूख, गतीमान अभियान राबवून स्वच्छता ठेवावी, असे आवाहन जिल्हाधिकारी विवेक जान्सन यांनी १०० दिवसांच्या कार्यालयीन सुधारणांची विशेष मोहिमेचा दुस-या टप्यातील कार्यालयाचा मुल्यामापन अहवाल आढावा व्ही.सी व्दारे घेण्यात आला. या प्रसंगी त्यांनी हे आवाहन केले.

यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी,आदित्य



जिवने, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासनाचे) शैलेस सुर्यवंशी तसेच विविध कार्यालयाचे कार्यालय प्रमुख व प्रतिनिधी उपस्थित होते.


याप्रसंगी जिल्हाधिकारी म्हणाले की, बीड जिल्हयामध्ये कार्यालयीन स्वच्छतेचा अभाव आढळून आला असून कार्यालयीन स्वच्छता हा पाया असून स्वच्छतेला प्रथम प्राधान्य द्यावे तसेच ही स्वच्छता केवळ अभियानापुरतीच मर्यादित न ठेवता कायम स्वरुपी ठेवावी.

१०० दिवसांच्या कार्यालयीन सुधारणेत कार्यालयाचा कायापालट, शौचालय, पिण्याचे पाणी, कार्यालयीन स्वच्छता, कर्मचा-यांच्या टेबलवर नेम प्लेट, थम मशीन या सुधारणेला गतिमानता मिळावी. नागरिकांसोबत व्यवहार करतांना संवेदनशिलपणे करावा.

कार्यालय

## चाकरवाडी येथे प्रदीप मिश्राजी यांच्या भव्य शिवमहापुराण कथेचे आयोजन





बीड । प्रतिनिधी

विसाव्या शतकातील महान संत विभूती सद्गुरु संत श्री ज्ञानेश्वर माऊली महाराज श्री क्षेत्र चाकरवाडी यांच्या २५ व्या पुण्यस्मरणार्थ (रौप्य महोत्सवी वर्ष) निमित्त परमपूज्य पं. श्री. प्रदीप मिश्राजी यांच्या भव्य शिवमहापुराण कथेच्या आयोजनासह भव्य अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन श्रीक्षेत्र चाकरवाडी येथे करण्यात आले आहे. या कार्यक्रमासाठी भव्य अशा प्रकारचा मंडप उभारला जाणार असून बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, महादेव महाराज

चाकरवाडीकर यांच्या शुभहस्ते दिनांक ३० एप्रिल रोजी अक्षय तृतीयेच्या शुभ मुहूर्तावर मंडप उभारण्याचे पूजन करून मंडप उभारणीचा शुभारंभ करण्यात येणार आहे. महादेव महाराज चाकरवाडीकर यांनी जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षक यांची भेट घेऊन त्यांना या कार्यक्रमाचे निमंत्रण दिले. यावेळी व्यापारी महासंघाचे बीड जिल्हाअध्यक्ष संतोष सोहनी, विनोद पिंगळे, दै.झुंजार नेता चे उपसंपादक अशोक वाणी, अभिषेक चरखा, पंकज भुतडा, राजू पटेल, शत्रुघ्न पटेल, मनोज देशमुख यांचे उपस्थिती होती. कार्यक्रमाचे भव्य दिव्य नियोजन पाहता उपस्थित भक्तांची संख्या १२ ते १५ लाखाच्या जवळपास राहणार आहे.

## पिंपळवाडी बिंदुसरा नदीवरील पुलाचे काम अंतिम टप्प्यात

### लवकरच वाहतुकीसाठी पुल खुला होणार -राजेंद्र मस्के

**बीड प्रतिनिधी**

**लिंबागणेश जिल्हा परिषद सर्कल मधील पिंपळवाडी ते भाळवणी रस्त्यावर बिंदुसरा नदीवरील पुलाचे काम अंतिम टप्प्यात आले असून, सामान्य जनतेला वाहतुकीसाठी हा पुल पुढील काही दिवसात खुला होणार असल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्रजी मस्के यांनी दिली आहे.**

पिंपळवाडी, भाळवणी डोंगरी पट्ट्याचा परिसर.

या परिसरातील शेतकरी शेतीसह दूध, दही, भाजीपाला शेती पुरक व्यवसाय करतात. रोज बीड शहरात दुध दही विकण्यासाठी येतात. डोक्याचावाडा साठवण तलावाखाली बिंदुसरा नदीचे पात्र



रुंद असल्यामुळे पावसाळ्यात शाळेतील मुले, दुग्ध व्यवसायीक शेतकरी, सर्वसामान्य माणूस यांना रहदारीला अडचण होते. पुरसदृश्य परिस्थितीत पिंपळवाडी व परिसरातील गाव खेड्यांचा पुला अभावी संपर्क तुटतो.यामुळे जनतेचे हाल होतात. पुला अभावी पावसाळ्यात होणारी अडचण लक्षात घेऊन,अनेक वर्षापासून या पुलाची मागणी ग्रामस्थ करत होते. लिंबागणेश जिल्हा परिषद सर्कलचे जिल्हा परिषद सदस्य राजेंद्र मस्के यांच्याकडे डोंगरपट्ट्यातील नागरिकांनी पुलाची मागणी केली होती. डोंगरपट्ट्यातील गाव खेड्यांना जोडणारा हा महत्वपूर्ण पुल

## निर्धार पक्का - गेवराई मतदारसंघातील स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका ताकदीने लढवू -आ.संदीप क्षीरसागर

**गेवराई । प्रतिनिधी**

गेवराई मतदारसंघातील स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका पूर्ण ताकदीने लढवून, सर्व सामान्य कार्यकर्त्यांच्या पाठीशी शरद पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची ताकद उभी करणार आहे. त्यामुळे,पक्षाच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांनी ,कार्यकर्त्यांनी जोमाने कामाला लागावे, असे आवाहन आमदार संदीप भैय्या क्षीरसागर यांनी येथे केले आहे. रविवार ता. २८ रोजी सायंकाळी सात वाजता आमदार क्षीरसागर यांनी शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे गेवराई तालुका अध्यक्ष अण्णासाहेब राठोड यांच्या संपर्क कार्यालयात भेट देऊन, कार्यकर्त्यांशी संवाद साधला. ते म्हणाले की, गेवराई मतदारसंघातील जनतेने लोकसभा निवडणुकीत भरघोस प्रतिसाद दिला. खा. बजरंग बप्पा सोनवणे यांना मोठी मदत करून मतदारसंघातील मायबाप जनतेने प्रचंड लीड दिली. आता, येणाऱ्या काळात गेवराई मतदारसंघातील पक्षाच्या कार्यकर्त्यांना बळ द्यायचे काम आदरणीय शरद पवार यांच्या




मार्गदर्शनाखालीच करणार आहे. या पुढच्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सर्व निवडणुकीत ताकदीने उतरणार आहे. नगर परिषद, जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या निवडणुकीत पक्षाची ताकद दाखवून देण्यासाठी मी स्वतःच गेवराई मतदारसंघात वेळ देणार आहे. पक्षाचे अध्यक्ष अण्णासाहेब राठोड यांच्या नेतृत्वाखाली गेवराई तालुक्यातील सर्व स्थानिक स्वराज्यसंस्थेच्या निवडणुका लढवून, सामान्य कार्यकर्त्यांना न्याय द्यायची भूमिका आम्ही पार पाडू, त्यामुळे सर्व कार्यकर्त्यांनी निवडणुकीच्या तयारीला लागावे, असे आवाहन ही आमदार संदीप क्षीरसागर यांनी येथे बोलताना केले.

## लक्ष्मण आठवले यांचे वृद्धापकाळाने निधन

बीड । प्रतिनिधी

कुक्कडगाव येथील आदर्श नागरिक लक्ष्मण काशिनाथ



आठवले याचे वयाच्या ९२ व्या वर्षी मंगळवार मध्यरात्री २.२५ वा वृद्धपकाळाने निधन झाले त्यांचा अंत्यविधी सकाळी १०:३० वा कुक्कडगाव या ठिकाणी नातलग,अपतेष्ठ,ग्रामस्थ यांच्या उपस्थितीत संपन्न झाला,सर्वांशी प्रेमाने आणि आपुलकीने बोलण्याने त्यांनी अनेकांशी ऋणानुबंध जोडले होते.त्यांचे रक्षाविसर्जन गुरुवार दि..१ मे रोजी सकाळी ८ वा.आणि जलदान विधी दु. १२:३० वा त्यांच्या राहत्या घरी संपन्न होईल. त्यांच्या पश्चात दोन मुले तीन मुलीं नातवंडे, नातलग असा मोठा परिवार आहे.

## प्राणीमात्रांचा जिव्हाळा अन् पशुसंवर्धन मंत्र्यांचं पशुधनांविषयीचं मातृवत 'वात्सल्य' आलं समोर

### पंकजाताई मुंडेंनी स्विकारलं दोन गोड पिलांचे पालकत्व: 'प्रिती व रोझी' च्या गृहप्रवेशाचं हृदयस्पर्शी स्वागत

**परळी वैजनाथ । प्रतिनिधी**

**राज्याच्या पर्यावरण व वातारणीय बदल तसेच पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांची संवेदनाशीलता सर्व परिचित आहे. त्याचबरोबर त्यांचे श्वानप्रेमही सर्वांना ज्ञात आहे.एक व्यासंगी, परखड वक्ता, अभ्यासू खंबीर लोकनेता अशी प्रतिमा असलेल्या पंकजाताई मुंडे यांच्या अतिशय संवेदनाशील व मातृवत वात्सल्यपूर्ण व्यक्तिमत्त्वाची अनुभूती अनेकवेळा येते.असाच काहीसा प्रसंग काल बघायला मिळाला. या प्रसंगातून व्यक्ती म्हणून पंकजाताईंचा प्राणीमात्रांबद्दलचा जिव्हाळा अन् पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई म्हणून पशुधनांविषयीचे त्यांचे मातृवत 'वात्सल्य' समोर आले आहे.**


कोल्हापूर येथील श्वानपालक सोनाली शिंदे यांनी स्वतःच्या घरी लेकरं



सांभाळावे या पद्धतीने आठ श्वानांच्या पिलांचा सांभाळ केलेला होता.यापैकी दोन पिलं त्यांनी पंकजाताई मुंडे यांना देवू केली.श्वानप्रेमी असलेल्या पंकजाताई व त्यांचा सुपूत्र आर्यमान यांना अतिशय आनंद झाला.या नविन दोन श्वानांच्या आगनमनाचा उत्साह व उत्सुकता त्यांना लागलेली होती. अतिशय भावनिकतेने व जिव्हाळ्याने कोल्हापूर येथील श्वानपालक सोनाली शिंदे यांनी या पिलांचा सांभाळ केलेला होता. त्यांनाही या पिलांचा विरह सहन होणारा नव्हता. त्यामुळे सर्व प्रकारची काळजी घेत कोल्हापूरहून मुंबई पर्यंतचा प्रवास करत शिंदे कुटुंब ही पिले घेऊन आली. पंकजाताई मुंडे यांच्या रामटेक या शासकीय निवासस्थानी या पिलांना आणण्यात आले यावेळी सोनाली शिंदे व त्यांच्या कुटुंबीयांचे पंकजाताईंनी कृतज्ञतापूर्वक अतिशय प्रेमाने स्वागत केले. त्याचबरोबर त्यांनी आणलेल्या रोजी आणि प्रिती या दोन श्वान पिलांचे मातृवत स्वागत केले. आपल्या कुटुंबात नव्या सदस्यांचे स्वागत करावे असा

## लिंबागणेशच्या जडणघडणीचा मुक साक्षीदार असणाऱ्या वटवृक्षाला भिषण आग

### २ तासानंतर अग्निशामक दलाला आग विझविण्यात यश :- डॉ.गणेश ढवळे



लिंबागणेश । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील श्रीक्षेत्र भालचंद्र गणपती देवस्थानामुळे प्रसिद्ध असलेल्या अडीचशे वर्षांपूर्वीचा ४-५ पिढ्यांचा लिंबागणेशच्या जडणघडणीचा मुक साक्षीदार असणा-या वटवृक्षाला आज दि.२९ मंगळवार रोजी सकाळी आग लागली. डॉ.गणेश ढवळे, विक्रांत वाणी यांनी बीड नगरपरीषदेच्या अग्निशामक दलाशी संपर्क साधुन दुर्दैवी घटनेची कल्पना दिली.अर्ध्यातासात बीड नगर परीषदेचे अग्निशामक दलाचे रमेश आदमाने,अक्षय नखाते आणि वाहन चालक अनिकेत कपाळे यांनी घटनास्थळी धाव घेऊन आग विझवण्याचा प्रयत्न केला. २ तासांच्या अथक प्रयत्नानंतर आग विझविण्यात यश आले.दरम्यान पाणी संपल्याने लिंबागणेश येथील गावाला टँकर द्वारे पिण्याचे पाणी पुरवठा करणाऱ्या दादाराव येडे यांनी विनामूल्य आग विझवण्यासाठी पाणी उपलब्ध करून दिले. बीड वनपरीक्षेत्र अधिकारी अशोक काकडे यांना कळल्यानंतर वनविभागाचे दोन कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी येऊन पंचनामा केला.

बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील बसस्थानक परिसरातील जवळपास अडीचशे वर्षांपूर्वीच्या वटवृक्षाला आज सकाळी ९ च्या सुमारास आग लागल्याचे निदर्शनास आले. ग्रामस्थांनी याठिकाणी गर्दी केली होती. आगीने रौद्ररूप धारण केल्याने आग विझवण्यासाठी अग्निशामक दलाला पाचारण केले.आगीत वटवृक्षाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे व विक्रांत वाणी यांनी बीड अग्निशामक दलाला तसेच वनपरीक्षेत्र अधिकारी

# ही भारतासाठी सुवर्णसंधीच

अमेरिकेच्या अध्यक्षांकडून नवनवीन धोरणांचा धडाका उडवला जात असताना जागतिक बाजारात तसेच जनमानसात उठणारी आंदोलने अधिकाधिक तीव्र होत आहेत. अमेरिकेला पूर्वीची श्रीमंती मिळवून देण्यासाठी ट्रम्प महाशयांनी तेथील परदेशी व्यक्तींना येनकेन प्रकारे देशाबाहेर घालवण्यासाठी अनेक वाटा-पळवाटा शोधल्या. यातून अनेक उच्चपदस्थही सुटणार नाहीत. मात्र भारताने या सुवर्णसंधीचा लाभ उठवायला हवा.

सध्या अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी जगभरातील आयातीवर मोठ्या प्रमाणात शुल्क लावून जागतिक व्यापारावर तसेच जागतिकीकरणावर हल्ला चढवला आहे. भारतातील सर्व प्रसारमाध्यमे, राजकारणी तसेच तथाकथित बुद्धिवादी अमेरिकेने सुरू केलेल्या या आर्थिक युद्धाची झळ आपल्याला कितपत बसेल यावर काथ्याकुट करत आहेत; परंतु याच वेळी राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी अमेरिकेतील संपूर्ण शिक्षणपद्धती, तेथील संशोधन संस्था या सर्वांवर हल्लाबोल करुन परकीय विद्यार्थ्यांचे अमेरिकेत येणे अशक्यप्राय करून सोडले आहे. आपल्या वंशाचे अनेक नागरिक तंत्रज्ञान क्षेत्रात परदेशी उच्च पदांवर असल्याचा अभिमान भारतीय लोक बाळगतात; परंतु गेल्या ६०-७० वर्षांपासून प्रतिभासंपन्न भारतीय, शास्त्रज्ञ आपल्या देशातून पलायन करून अमेरिका व इतर प्रगत राष्ट्रांमध्ये जाऊन त्यांची अर्थव्यवस्था बळकट करत आहेत, याकडे आपण पूर्णपणे कानाडोळा करत आहोत. येत्या एक ते दोन वर्षांमध्ये आपण मानवासह पहिले अंतरिक्षयान पाठवण्याचे मनसुबे रचत आहोत. त्याच वेळी गेल्या तीन वर्षांपासून चीनने अवकाशात आपला तळ उभारला आहे, तसेच चीनी अंतरिक्षयात्री नियमितपणे तेथे ये-जा करत असतात. अंतरिक्ष तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात आपण चीनपेक्षा वीस वर्षे मागे आहोत. पण १९६० च्या दशकात ही स्थिती अगदी वेगळी होती. त्यावेळी भारत हा एकमेव आशियाई देश होता, ज्याने स्वत: रचना तसेच संशोधन करून स्वदेशी बनावटीचे 'मारुत' हे विमान तयार केले होते. त्यावेळी तंत्रज्ञानाच्या सर्व क्षेत्रांमध्ये चीन आपल्यापेक्षा किमान दहा वर्षे मागे होता; परंतु १९६० च्या दशकात माओ त्से तुंग यांच्या नेतृत्वाखाली चीनमध्ये प्रामाणिक सरकार होते. त्याने अमेरिकेतील चीनी नागरिकांना तसेच तंत्रज्ञांना मायदेशात परतण्याचे आवाहन केले होते. त्याला प्रतिसाद देऊन अमेरिकेच्या नामवंत विद्यापीठांमधील शास्त्रज्ञ तसेच तंत्रज्ञ चीनला परत आले. अंतरिक्षात चीनच्या प्रगतीचा पाया या परदेशातून परत आलेल्या चीनी नागरिकांनीच घातला.

याउलट भारताची स्थिती होती. दरवर्षी भारताच्या उच्चतंत्र शिक्षणसंस्थांमधून शिक्षित झालेले ६० ते ७० टक्के तज्ज्ञ या काळात अमेरिकेची वाट धरत होते. या स्थितीला दोन बाबी जबाबदार होत्या. आपल्या देशात संशोधनाच्या आणि कामाच्या पुरेशा संधी उपलब्ध नव्हत्या. दुसरे म्हणजे संशोधनक्षेत्रातील व्यक्तींना अत्यंत तुटपुंजे आर्थिक पाठबळ मिळत असे. काही अपवाद वगळता भारतातील मोठमोठे उद्योजक परदेशातून तंत्रज्ञान आयात करून त्या आधारे उत्पादनावर भरघोस नफा मिळवण्यातच धन्यता मानत. इतर देशांप्रमाणे संशोधन क्षेत्रात खासगी गुंतवणूक अत्यंत कमी आहे. त्यातच सरकारनेही हात आखडता घेतल्याने आयआयटीसारख्या संस्थांमधून बाहेर पडलेले प्रतिभावान मनुष्यबळ अमेरिकेतच स्थायिक झाले. किंबहुना, 'अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेसाठी कुशल तंत्रज्ञ पुरवणारी संस्था' असेच आयआयटीचे नाव झाले. परदेशातून आलेल्या तंत्रज्ञ आणि शास्त्रज्ञांच्या बळावर अमेरिकेची भरभराट झाली; परंतु अमेरिकेतील गोऱ्या लोकांना या सर्व बदलामध्ये आर्थिक झळ पोहोचली. म्हणूनच त्यांनी ट्रम्प यांना भरघोस मते देऊन सत्तेवर आणले. दूरदृष्टी नसणारे ट्रम्प सरकार वेगवेगळे कायदे करून अमेरिकास्थित ग्रीनकार्डधारक भारतीयांचे जगणे कठीण करत आहे. आता अशा अवस्थेत अनेक भारतीय मायदेशी परतण्याची संधी शोधत आहेत. परकीय विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या मदतीवर कुऱ्हाड टाकल्यामुळे या वर्षीपासून उच्च शिक्षणासाठी अमेरिकेला जाणाऱ्या लोकांचा लोंढा जवळपास थांबला आहे. बहुतांश प्रतिभावान पण मध्यमवर्गीय विद्यार्थी केवळ या भरघोस शिष्यवृत्त्यांमुळेच अमेरिकेकडे आकृष्ट होत असत. अर्थातच धनाढ्य लोक आणि राजकारणी वशिलेबाजी करुन पाल्यांना 'पेमेंट सीट'वर अमेरिकेत पाठवत असत; परंतु अमेरिकेतील एकूण विद्यार्थीसंख्येमध्ये यांचे प्रमाण बरेच कमी होते. अमेरिकेला जाण्याचा रस्ता बंद झाल्यामुळे इच्छा नसूनही अनेक प्रतिभावान शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ भारतात संधीच्या शोधात आहेत. पण गेल्या अनेक वर्षांपासून संशोधन आणि उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात निधी देण्याबाबत सरकारने हात आखडता घेतला आहे. त्यातच भारतातल्या 'बाबू राज्या'मध्ये संशोधनासाठी लागणाऱ्या उपकरणांवर जीएसटीचाही भार टाकला गेला आहे. एकीकडे सरकारी अनुदानानेच सरकारी प्रयोगशाळांसाठी खरेदी केलेल्या वस्तूंवर सरकार कर लादून पैसा एका खिशातून दुसऱ्या खिशात टाकत आहे. परिणामी शास्त्रज्ञांना संशोधनाऐवजी गुंतागुंतींचे नियम आणि उपकरणे मिळवण्यातच वेळ दवडावा लागतो. मोदी सरकारने इतर अनेक चांगल्या गोष्टी केल्या हे निर्विवाद परंतु सरकारी 'लाल फितीचा कारभार' तसेच 'इन्स्पेक्टर राज'ला त्यांना धक्का लावता आलेला नाही. याची काही साधी उदाहरणे म्हणजे गेल्या ७०-७५ वर्षांमध्ये केवळ चार-पाच भारतीयांनाच नोबेल पुरस्कार मिळाला आहे. त्यातही हरगोविंद खुराणांपासून व्यंकी रामकृष्ण यांच्यापर्यंत सर्वच्या सर्व भारताबाहेरच काम करत होते. दुर्दैवाने आपल्या अर्थखात्यावर कारकुनी वृत्तीचा जबरदस्त पगडा आहे. त्यामुळे शास्त्र आणि तंत्रज्ञान यातील संशोधनावर झालेला खर्च अनाठायी आहे, अशी धारणा दिसते.

ही परिस्थिती बदलायची असेल तर उद्योगधंदे उभारायला 'एक खिडकी योजना' सारखे कार्यक्रम राबवले जाण्याची तसेच संशोधनासाठीही काही योजना राबवण्याची गरज आहे. एक तीन कलमी कार्यक्रम लवकरात लवकर अमलात आणण्याचीही गरज आहे. यातील पहिला मुद्दा म्हणजे विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती वेळच्या वेळी दिली जावी आणि संशोधनासाठी दिल्या जाणाऱ्या शिष्यवृत्त्या दुप्पट केल्या जाव्यात. या सर्वांसाठी लागणारा निधी आयआयटी किंवा आयसरसारख्या महत्त्वाच्या संस्थांना वेळेवर दिला जावा. संशोधनासाठी मंजूर झालेला निधी काही कारणांमुळे ३१ मार्चपर्यंत खर्च न झाल्यास आपोआपच पुढील वर्षापर्यंत मुदतवाढ मिळावी. ही काही नवी बाब नाही. वाजपेयींच्या काळात संरक्षण तसेच इतर क्षेत्रातील संशोधनाबाबत अशाच प्रकारचे नियम आखले गेले होते; परंतु यूपीए सरकार आल्यावर ही चांगली सुधारणा रद्द केली गेली आणि ३१ मार्चपर्यंत खर्च न झालेला निधी सरकारजमा करुन अर्थसंकल्पात शिल्लक दाखवण्यात अर्थमंत्री धन्यता मानू लागले. दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे नव्या प्रणालीनुसार स्वयंपूर्णतेच्या नावाखाली संशोधनासाठी लागणाऱ्या वस्तूंची खरेदीही केंद्रीयकृत केली गेली आहे. देश आत्मनिर्भर असावा आणि गरज नसताना आयात केली जाऊ नये, हा उद्देश स्तुत्य आहे; परंतु संशोधनासाठी लागणारी उपकरणे किंवा वस्तू सर्वसाधारण व्यापारात बसत नाहीत. उदाहरणार्थ, संशोधनासाठी लागणारी काही रसायने ९९ टक्के शुद्ध असावी लागतात. जगभरात याची मागणी जेमतेम १००-२०० किलोग्राम असते. त्यामुळे अशा प्रकारची खास रसायने वा उपकरणे तयार करणारे उद्योग जगात हाताच्या बोटांवर मोजण्याइतकेच आहेत. त्यांच्याकडून आयात करण्याखेरीज पर्याय नाही. खेरीज केवळ वर्षाला १०-१५ किलो लागणारी रसायने बनवण्यासाठी कोणी कारखानाही उभा करु शकत नाही. संशोधनासाठी लागणाऱ्या उपकरणांचे तसेच पदार्थांचे हे विशेष लक्षात घेऊन या वस्तूंच्या खरेदीचे केंद्रीकरण करणे चुकीचे आहे. म्हणूनच सध्याची ही व्यवस्था बंद करुन आयआयटी सारख्या संस्थांच्या संचालकांना हा निर्णय घेण्याची अनुमती दिली जावी. नेहमीच्या शिरस्त्याप्रमाणे शास्त्रज्ञांनी शंभर रुपयांचे एखादे उपकरण घेण्याची अनुमती मागितली की लालफितीच्या खाक्यानुसार २५ टक्के कमी करुन संमती दिली जाते. थोडक्यात सांगायचे तर, संपूर्ण हत्तीची गरज असताना तीन चतुर्थांश हत्ती द्यायचा, असा हा खाक्या आहे. ही लाल फित कापण्याची सर्वाधिक गरज आहे.

# बेस्ट सुदृढ होणे, ही मुंबईकरांची गरज

मुंबई महापालिकेने बेस्टच्या भाडेवाढीला मंजुरी दिली असून यामुळे बेस्टला ५९० कोटी रुपयांचा वार्षिक महसूल प्राप्त होणार आहे. मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी आहे आणि या शहराला प्रवाशांच्या सेवा पुरवणाऱ्या बेस्टचे भाडे मात्र किरकोळ असे होते. जास्तीत जास्त भाडे २० रुपये होते. त्यामुळे प्रवाशांची चंगळ होत असली तरीही ही विलक्षण सेवा डबघाईला आली होती. त्यामुळे आता बेस्टने प्रवासी भाडेवाढ केली आहे आणि ज्यामुळे किमान भाडे दहा रुपये होणार आहे. तरीही मुंबईची आर्थिक स्थिती आणि मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी आहे ही बाब लक्षात घेता ही भाडेवाढ काहीच नव्हे. २०१९ मध्ये बेस्टने किमान भाडे पाच रुपये केले होते आणि त्यामुळे बेस्टच्या बसेसमध्ये खचाखच गर्दी होत होती. बेस्टचे एसव्हीआर श्रीनिवास यांनी फेब्रुवारी २०२५ मध्ये भाडेवाढीचा प्रस्ताव मांडला आणि त्याला महापालिकेने मंजुरी दिली.

बेस्ट ही मुंबईकरांची दुसरी लाईफलाईन म्हटली जाते आणि दररोज ३१ लाख प्रवाशांना ती वाहून नेते. बेस्टच्या ताफ्यात २१८६ बसेस आहेत आणि त्यापैकी ८४७ या बेस्टच्या स्वतःच्या मालकीच्या आहेत. भाडेवाढीमुळे बेस्टचा महसूल १४०० कोटी रुपयांनी वाढणार आहे अशी अपेक्षा आहे. कोणतेही सोंग आणता येते पण पैशाचे सोंग आणता येत नाही. त्यामुळे बेस्टची परिस्थिती डबघाईला आली असताना बेस्टची अवस्था 'खिशात नाही आणा आणि मला बाजीराव म्हणा' अशी झाली होती. बेस्टला सातत्याने मुंबई महापालिकेकडे भाडेवाढ करण्याची मागणी करावी लागत होती आणि बेस्ट उपक्रमाकडून हा निर्णय घेण्यात आला आहे. जरी या भाडेवाढीमुळे मुंबईकरांच्या खिशाला झळ बसणार आहे तरीही हा निर्णय आवश्यकच होता, कारण मुंबईकर काही इतके गरीब नाहीत की बेस्टची थोडी भाडेवाढ ते सहन करू शकत नाहीत. बरेच दिवसांपासून भाडेवाढीचा प्रस्ताव मंजुरीसाठी पडून होता. अखेर त्यास मंजुरी देण्यात आली आणि बेस्टचा भाडेवाढीचा मार्ग मोकळा झाला आहे. अर्थात बेस्टने तिकीटात भाडेवाढ केली असली तरीही सवलतीच्या दरात कुठलीही वाढ केलेली नाही. हा त्यातल्या त्यात दिलासा आहे.

गेल्या आठवड्यात बेस्टने भाडेवाढ करण्याचा प्रस्ताव दिला असताना शिवसेना उबाठाने या मुद्यावर राजकारण सुरू केले आहे. शिवसेना उबाठाच्या कार्यकर्त्यांनी रास्ता रोको केले. वास्तविक शिवसेना उबाठाच्या हातात महापालिकेची सत्ता इतकी वर्षे होती. पण शिवसेना (उबाठा)ने कधीही बेस्टला गर्तेतून वर आणण्याचे प्रयत्न केले नाहीत. शिवसेना युवानेते तर सातत्याने नाईटलाईफच्या प्रस्तावात मग्न होते. पण बेस्टला संकटातून बाहेर काढण्याचे



त्यांना कधीही सुचले नाही. आता मात्र राज्यातील सत्ता हातातून गेल्यावर त्यांना प्रवाशांचा कळवळा आला आहे आणि हा कळवळा किती खोटा आहे ते समजतेच. राज्य सरकारवर शिवसेना उबाठा गटाने आरोप करण्याचे सुरूच ठेवले आहे, पण जनता दुधखुळी नाही. इतके दिवस शिवसेना उबाठाच्या हातात बेस्ट असताना तिचे किती कल्याण केले हा विचार जनतेच्या मनात येतोच. सहा वर्षे बेस्टच्या प्रवाशांनी अल्प दरात प्रवास एन्जॉय केला. त्यामुळे आता थोडी खिशाला तोशिस पडली तरी ते मुंबईकरांच्या हिताचेच आहे. याबरोबरच बेस्टने आपली सेवा अद्ययावत करण्यासाठीही प्रयत्न करायला हवेत.

गेल्या कित्येक वर्षांत बेस्टच्या ताफ्यात नवीन बसेसची भर पडली नाही. कित्येक बसेस कमी करण्यात आल्या आहेत आणि इलेक्ट्रिक बसेस अजून पुरेशा म्हणाव्या तशा आणल्या नाहीत. त्यामुळे नाईलाजाने बेस्टला भाडेवाढ करावी लागली आहे. काही तज्ज्ञांनी तर अशी मागणी केली आहे की जोपर्यंत बेस्टच्या ताफ्यात नव्या ५०० बसेस आणल्या जात नाहीत तोपर्यंत आम्ही कोणत्याही प्रकारच्या भाडेवाढीला विरोध करू. असे म्हणणे सोपे आहे, पण प्रत्यक्षात ते अत्यंत अवघड आहे. विरोधक आता बोंब मारतील की सरकारने निवडणुका झाल्या की भाडेवाढ केली आहे, पण ज्यांना इतिहासाची माहिती आहे आणि बेस्टच्या हालाखीची माहिती आहे त्यांना हे पटेल की बेस्टने किती तरी वर्षांत भाडेवाढ केलीच नाही. त्यामुळे ही बेस्टची भाडेवाढ आता अपरिहार्य झाली आहे.

तुम्ही किती काळ न पेलणारे ओझे घेऊन चालत रहाणार याला काही मर्यादा असते. बेस्टने ती मर्यादा कधीचीच ओलांडली आहे. त्यामुळे आता भाडेवाढ करण्याचा निर्णय घ्यावा लागला आहे. जरी कितीही भाडेवाढ झाली तरीही बेस्ट ही मुंबईकरांसाठी योग्य वाहतूक व्यवस्था आहे.

लोकल ट्रेनच्या खालोखाल मुंबईचे दररोज ३१ लाख प्रवासी बेस्टने ये-जा करतात. त्यामुळे बेस्टशिवाय लोकांना पर्याय नाही. तोट्यात महामंडळ गेले आहे आणि तरीही अजूनही बेस्टने यातून मार्ग शोधले नाहीत, तर हे जड ओझे घेऊन चालण्याचे कुणालाच जमणार नाही. बेस्टच्या इतिहासात ही पहिलीच भाडेवाढ नाही. काँग्रेस आणि राष्ट्रवादी सरकार असताना कितीतरी वेळा भाडेवाढ झाली आहे. पण त्यावेळी गप्प असलेले विरोधक आता मात्र भाडेवाढ झाल्यावर ओरडत आहेत हे त्यांचे अज्ञान मूलक आहे. कारण बेस्ट हा पांढरा हत्ती आहे आणि तो किती काळ पोसायचा याला काही मर्यादा आहेत. पण आपली राज्यव्यवस्था ही लोकशाही असल्याने सरसकट बेस्ट बंद करता येत नाही आणि प्रवाशांना परवडणाऱ्या दरातच प्रवास सेवा उपलब्ध करून देणे राज्य सरकारवर जबाबदारी येते. त्यामुळे ही भाडेवाढ झाली तर ती स्वीकारणे योग्य राहील. कारण दुसरा काहीच उपाय नाही. जे विरोधक आज बोंब मारत आहेत की भाडेवाढ करू नका त्यांच्याकडे दुसरे काही उपाय असतील तर त्यांनी सांगावेत. पण तसे ते करणार नाहीत. बेस्टची भाडेवाढ प्रस्तावित आहे. अजून झालेली नाही. पण ती स्वीकारणे योग्य आहे.

पान १/४ वरून

## आंबेडकरांनी भारतीयांना

राजू जोगदंड, किशोर कांडेकर, किसन तांगडे, सुभाष तांगडे, अण्णा भोले, किशोर भोले, शुभम भोले, विजय डोळस, नवनाथ डोळस, विजय सुपेकर, गोरख डोळस, राहुल कांबळे, सुनिल कांबळे, विभीषण जावळे, बंडू घुमरे, सुनिल गायकवाड,प्रमोद गायकवाड यांच्यासह शेकडो अनुयायी उपस्थित होते.

## जगातील सर्वश्रेष्ठ राज्यघटना

टक्के पूर्ण करू.गल्ली ते दिल्ली आज आपले सरकार आहे त्यामुळे चांगल्या आणि सकारात्मक कामाला आपल्याला कसल्याही प्रकारची अडचण येणार नाही.या कार्यक्रमास लहू लगड सर, गणेश म्हेत्रे सर, दलीत पँथर जिल्हाध्यक्ष नितीन सोनवणे,सचिन तिपटे,

गणेश प्रभू पवार,महादेव उद्धव ओव्हाळ,राहुल कचरू कांबळे,प्रभू नामदेव पवार,सतीश दशरथ सोळुंके,सागर सुरेश सोळुंके,अशोक गायकवाड आदी मान्यवर उपस्थित होते या सुंदर कार्यक्रमाचे आयोजन विकास वाव्हळ यांनी केले होते

## परळी गंगाखेड राष्ट्रीय महामार्गाचे

जवळपास ५० फूट रोलिंग नसल्याने वाहनांना धोका निर्माण झाला आहे. सदरील निवेदनाच्या प्रति नामदार मंत्री पंकजाताई गोपीनाथराव मुंडे, नामदार माननीय माजी मंत्री धनंजयजी मुंडे, माननीय जिल्हाधिकारी बीड, माननीय तहसीलदार परळी वैजनाथ आणि माननीय पोलीस निरीक्षक संभाजीनगर यांना मेलद्वारे पाठवल्या आहेत. यावेळी अनिल चौधरी, काशिनाथ सरवदे, मुंजाभाऊ साठे ,दगडू भाले, सुंदर आव्हाड, संदीप चौधरी, गिरीश सलगरे, प्रवीण रोडे ,संतोष कांबळे, देविदास मुंडे, प्रमोद गिरी, राम गडदे ,राम चाटे, अनंत कातकडे, पापा क्षीरसागर, श्रीमंत मुंडे,गिवेश मिसाळ,दिनेश मिसाळ, श्याम जाधव आणि भास्कर नावंदे आदीसह मित्र मंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते.

## ज्या घरात संपत्ती,दया आहे

कावळा हाणला नाही ते असतात.ग्रहस्थी माणसाच्या दारातून एखाद्या याचक विन्मुख गेला तर त्या याचकाचे काही होत नाही पण घर मालकाचे मागील पुण्य संपते.धाब्याचा काळ आला आणि अतिथी धर्म बुडाला घरचे माणसेच घरी जेवत नाहीत तर अतिथीला कुठून जेवण देणार असेही शेवटी शास्त्री महाराज म्हणाले. यावेळी माजी आ.साहेबराव दरेकर,देविदास धस,सेवानिवृत्त आयुक्त सुनील चव्हाण,सतीष शिंदे,डॉ. शिवाजी राऊत,दशनाम गोसावी संघटनेचे बीडचे संस्थापक अध्यक्ष ॲड.राजेंद्र बन, ह.भ.प.ब्रम्हचैतन्य महाराज तावरे,आष्टी दूध संघाचे चेअरमन शांतीलाल भोसले, उद्योगपती अण्णासाहेब चौधरी, उद्योगपती संदीप गोसावी (पुणे), बाळासाहेब बनगे (तलाठी),सरपंच अशोक मुळे,माजी सरपंच आदिकाताई लोखंडे,माजी सरपंच मनीषा मुटकुळे (मांडवा),दिलीप फौजी मुटकुळे, ह.भ.प.श्रीहरी महाराज पुरी, ह.भ.प.शिवाजी कोकणे महाराज, ह.भ.प.पांडुरंग भालके महाराज,नाना महाराज भोगाडे,तुकाराम भोसले महाराज,परसराम महाराज बन,अंकुश बन अकलूज, सायकड सर,प्रशांत शेंडगे (पुणे),रिटायर मेजर रामदास चव्हाण,डॉ.दत्तात्रय भोसले, रामदास बन,राजेंद्र बन, वसंत बन,आबासाहेब सापे,दिलीप गिरीसर,भागवत गिरी,रामनाथ बन,संजय गिरी,जालिंदर सोमासे,सूर्यभान धुमाळ आदी हजारो भाविक भक्त उपस्थित होते.यावेळी सूत्रसंचालन दिलीप गिरी सर यांनी केले. मान्यवरांचे व महाराजांचे सत्कार रामनाथ बन,अमोल बन,सदाशिव बन, आबा सापते, भागवत गिरी,रवि बन यांनी केले.हा सप्ताह यशस्वी होण्यासाठी शिवस्वरूप सप्ताह कमिटी आणि तरुण मंडळाने परिश्रम घेतले. या सप्ताहामध्ये पुढील वर्षासाठी नारळ उचलले रामनाथ बाबुराव बन १ लाख ११ हजार १११ रुपये, विठ्ठल युवराज गिरी (राजशिष्टाचार अधिकारी पुणे) यांचे १ लाख ११ हजार १११ रुपये,पत्रकार कै. दादासाहेब आत्माराम बन यांच्या स्मरणार्थ उमेश आत्माराम बन यांच्याकडून ५१ हजार रुपये

पान १/४ वरून

जाहीर करण्यात आले.

## राज्यात नवीन इलेक्ट्रिक वाहन

१९५१ अंतर्गत महाराष्ट्र भिक्षा प्रतिबंध नियम, १९६४ मधील नियम २७(ब) (३) मधील तरतूदीमध्ये सुधारणा. भिक्षागृहातील व्यक्तींना ५ रुपये ऐवजी आता ४० रुपये प्रतिदिन. १९६४ नंतर प्रथमच बदल (महिला व बाल विकास)

३. PM-Y-S-SVI या एकछत्री योजनेअंतर्गत ओ.बी.सी., ई.बी.सी. व डी.एन.टी. प्रवर्गातील विद्यार्थ्यांना भारत सरकार मॅट्रीकपूर्व व मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजनेंतर्गत केंद्र शासनाने सन २०२१-२२ ते २०२५-२६ या वर्षांकरिता निर्गमित केलेल्या सुधारित मार्गदर्शक सूचना राज्यात लागू करण्याचा निर्णय. (इतर मागास बहुजन कल्याण)

४. हडपसर ते यवत राज्य मार्गावरील सहा पदरी उन्नत मार्ग व अस्तित्वातील रस्त्याचे सहापदरी बांधकाम करण्यास मान्यता. ५२६२.३६ कोटी रुपयांचा मार्ग (सार्वजनिक बांधकाम)

५. सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत महा इनविट (पायाभूत सुविधा गुंतवणूक संस्था) स्थापन करण्यास मान्यता. (सार्वजनिक बांधकाम) ६. महाराष्ट्र राज्यात जहाजबांधणी व जहाजदुरुस्ती सुविधा आणि जहाज पुनर्वापर सुविधा विकसित करण्याबाबतच्या धोरणास मान्यता. (परिवहन व बंदरे) ७. महाराष्ट्र इलेक्ट्रीक वाहन धोरण, २०२५ ला मान्यता. (परिवहन व बंदरे) ८. प बेस वाहनांसाठी समुच्चयक (-ससीशसर्री) धोरण. (परिवहन व बंदरे) ९. सर्वसमावेशक पीकविमा योजनेत बदल करून केंद्र सरकारच्या अनिवार्य जोखीम बाबीवर आधारित पीकविमा योजना राबवणार तसेच कृषि क्षेत्रातील भांडवली गुंतवणूक वाढवण्यासाठी कृषि पायाभूत सुविधा निर्मितीवर भर देणारी योजना राबविणार (कृषी) १०. आदिवासी विकास विभागातर्फे अनुसूचित जमातीसाठी सुरू असलेल्या योजनांच्या धर्तीवर विशेष मागास प्रवर्गातील गोवारी समाजबांधवांच्या विकासासाठी विशेष कार्यक्रम राबविण्याचा निर्णय (इतर मागास बहुजन कल्याण) ११. म. रा. इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ तसेच वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळाच्या वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजनेची मर्यादा १० लाख रुपयांवरून १५ लाख रुपये करण्याचा निर्णय (इतर मागास बहुजन कल्याण)

## लोकाभिमूख व गतिमान

प्रमुखास काही अडचणी असेल तर त्यांनी माझ्याशी संपर्क साधवा, प्रंलबित विषयी लवकरात लवकर सोडवावे यासंदर्भात अडचणी असेल तर टिपणी टाकावी किंवा ते काम का प्रलंबित आहे ते मुद्दे माझ्या निदर्शनास आणून द्यावेत.

आपणास निधीची कमतरता असेल तर डिपीसीतून निधीची मागणी करावी, निधीची उपलब्धता करून दिली जाईल. १०० दिवसाची कार्यालयीन मोहिम दुस-या टप्प्यातील कामाची पीपीटी २ मे २०२५ पर्यंत कार्यालय प्रमुखाने सादर करावी अशी सूचना त्यांनी यावेळी केली. आपल्या काही नाविन्यपूर्ण कल्पना असतील तर त्याही मांडाव्यात त्याचा जरुर विचार केला जाईल, जेणे करुन कार्यालये आणि सोबतच जिल्हयातील स्वच्छतेचाही प्रश्न सुटेल. असे ते म्हणाले

## प्राणीमात्रांचा जिव्हाळा

अतिशय उत्साहात प्रिती आणि रोझीच्या गृहप्रवेशाचा एक छोटेखानी आनंदी सोहळा यावेळी साजरा करण्यात आला. पंकजाताई मुंडे यांनी हळद कुंकू लावून त्यांचं आत्मीय स्वागत केलं. मुक्या प्राण्यांनाही आत्मिय ओढ असते आणि विरहाची पण संवेदना असते. हे या एकाच अतिशय भावनिक प्रसंगात दिसून आले. कोल्हापूरच्या मोकळ्या वातावरणात जडणघडण झालेली व राहिलेली ही पिले मुंबईच्या वातावरणात कशी राहतील असा प्रश्न सर्वांनाच पडलेला असताना मात्र पंकजाताई मुंडे यांच्या जिव्हाळ्याने ही पिले त्यांना लगेचच बीलगल्याचे दिसून आले. शिंदे कुटुंबीय या पिलांना सोडून गेल्यानंतर

पान १/४ वरून

या पिलांना सुरक्षित वाटावे यासाठी स्वतः पंकजाताई मुंडे व त्यांचा मुलगा आर्यमान यांनी या पिलांना बराच वेळ सहवासही दिला. याबाबतचा एक भावनिक असा व्हिडिओही पंकजाताई मुंडे यांनी सोशल माध्यमातून शेअर केला. नव्या सदस्यांचे अगदी संवेदनशीलपणाने मातृवत स्वागत आणि काळजी घेतानाच्या पंकजाताई मुंडे यात दिसून येत आहेत. हे सर्व पाहतांना शिंदे कुटुंबीय अगदीच भारावून गेल्याचे दिसुन येत आहे.

दरम्यान सोनाली शिंदे युट्यूबर असुन त्यांनीही एका व्हिडिओद्वारे पंकजाताई मुंडेच्या या प्राणीप्रेमाचे व संवेदनाशीलतचे भरभरून कौतुक केले आहे. पोटच्या लेकरांप्रमाणे ज्या पिलांचा आपण सांभाळ केला आता त्यांना अतिशय छान घर आणि पंकजाताईंसारखे मातृवत प्रेम करणारे पालक मिळाल्याचा अतिशय आनंद झाल्याचे म्हटले आहे.

## लिंबागणेशच्या जडणघडणीचा

काकडे यांना फोटो आणि व्हिडिओ पाठवुन वडाला लागलेल्या आगीची कल्पना दिली. या झाडांवर वास्तव्यास असलेल्या पक्षांची घरटी आगीत जळून खाक झाली.

मानवी निष्काळजीपणामुळे आगीच्या घटनेत वाढ :- डॉ.गणेश ढवळे

उन्हाची तिव्रता वरचेवर वाढत चालली आहे. ग्रामीण भागात ग्रामस्थांनी कचरा व शेतकऱ्यांनी खोडवा पेटवण्याच्या घटनांमुळे वृक्ष आगीत होरपळून जात आहेत. ग्रामस्थांनी वारंवार आवाहन करूनही वृक्षांचे गांभीर्य लक्षात येत नसल्याचे आजच्या घटनेवरून दिसून येत आहे. पुढच्या पिढीच्या भवितव्यासाठी प्रत्येक माणसाने वृक्ष लागवड,वृक्ष संगोपन आणि आगीपासून संरक्षण करण्याची आवश्यकता असल्याचे वृक्षप्रेमी डॉ.गणेश ढवळे यांनी आवाहन केले आहे.

## निर्धार पक्का - गेवराई मतदारसंघातील

गेवराई तालुका अध्यक्ष अण्णासाहेब राठोड यांच्या कामावर समाधान व्यक्त करून, सामान्य चळवळीतल्या कार्यकर्त्यांना बळ देणार असून, राठोड यांची दखल घेऊ, अशी भावना ही त्यांनी व्यक्त केली. सर्वांच्या सहकार्याने आगामी काळातील सर्व निवडणुका नियोजन पद्धतीने निवडून येण्यासाठी लढवू असे मत बोलताना राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी तालुकाध्यक्ष अण्णासाहेब राठोड यांनी व्यक्त केले. यावेळी जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के , माजी आ. सय्यद सलीम , युवा नेते ऋषिकेश बेद्रे ,अल्पसंख्याक तालुका अध्यक्ष इरफान भाई ,शहराध्यक्ष सय्यद अख्तर, इरशाद भाई ,अलीम सय्यद ,खांडवीचे उपसरपंच विनायक चव्हाण, कुंभेजळगाव उपसरपंच सद्दाम भाई , व्हीजीएनटी तालुका उपाध्यक्ष अशोक राठोड, माजी उपसरपंच बाबासाहेब राठोड ,माजी उपसरपंच साहेबराव राठोड ,राम नाना राठोड ,अजिर पवार , नितीन पवार ,मानिक राठोड ,सतोष चव्हाण अचित महाराज ,गणेश राठोड ,धनू चव्हाण ,शरद पवार ,सुभाष महाराज, बाबासाहेब चव्हाण ,प्रकाश चव्हाण बबन राठोड ,आनंद चव्हाण , सतोष जाधव, रमेश जाधव, रेवन चव्हाण, विजय पवार, भोगलगावकर मजेर शेख ,अशोक राठोड यांच्या सह अनेक कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

## पिंपळवाडी बिंदुसरा नदीवरील

मंजूर करण्यासाठी शासन प्रशासन स्तरावर राजेंद्र मस्के यांनी सातत्याने पाठपुरावा करून हा पुल मंजूर करून घेतला. प्रलंबित विकास कामाला गती मिळाली.या पुलामुळे भविष्यात वाहतूकी साठी अडचण निर्माण होणार नाही.

या पुलाचे काम आज अंतिम टप्प्यात असून येणाऱ्या काही दिवसात आठ ते दहा गावांना सुलभतेने जोडणारा हा पूल जनतेसाठी खुला होणार आहे. आगामी काळात या भागातील विकास कामांना प्राधान्य देवून जनतेचे हित साध्य करण्यासाठी प्रयत्नशील राहाणार आहोत.असा विश्वास राजेंद्र मस्के यांनी दिला आहे

# भाजपाने तुम्हाला सन्मान दिला, तुम्ही आता पक्षाचे संघटनात्मक काम वाढवा-राम कुलकर्णी

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**केज विधानसभा मतदारसंघातील मंडळ प्रमुखाच्या निवडी जाहिर झाल्यानंतर आ.सौ.नमिता अक्षय मुंदडा यांच्या वतीने नवनिर्वाचित पदाधिकार्यांचा सन्मान करण्यासाठी अक्षय निवासस्थानी तातडीची बैठक बोलाविण्यात आली. ज्यामध्ये पक्षाचे जेष्ठ नेते नंदकिशोर मुंदडा, युवा नेते अक्षय मुंदडा यांची उपस्थिती होती.**

या बैठकीत बोलताना प्रदेश प्रवक्ते राम कुलकर्णी म्हणाले की, भारतीय जनता पक्षाने सन्मानाचं पद देवून विश्वास टाकल्यानंतर शहरात आणि तालुक्यात संघटनात्मक कामात कठोर परिश्रम घेतले तर नेतृत्व बळकट होते. त्याचबरोबर संघटना देखील मजबूत होवू शकते. नविन पदाधिकार्यांनी काम करताना आपल्या लोकनेत्या मंत्री ना.पंकजाताई मुंडे, माजी खा.डॉ.प्रितमताई मुंडे आणि या मतदारसंघाच्या आ.सौ.नमिताताई मुंदडा यांच्या मार्गदर्शनाखाली काम करताना केंद्र आणि राज्य सरकारने हाती घेतलेल्या विकास योजना तळागाळापर्यंत पोहोचविण्याची आपली जबाबदारी निश्चितच असते. मंडळाच्या माध्यमातून मिळालेली जबाबदारी प्रत्येक कार्यकर्त्यांनी सक्षमपणे पार पाडली तर खर्या अर्थाने तळागाळापर्यंत आपला विचार निश्चित पोहोचल्याशिवाय रहाणार नाही असे त्यांनी सांगितले. या मतदारसंघातील मंडळाच्या निवडी जाहिर झाल्यानंतर अक्षय निवासस्थानी आमदारांच्या वतीने नुतन पदाधिकार्यांच्या उपस्थितीत तातडीची बैठक घेवून त्यांचा सन्मान करण्यात आला. अंबाजोगाई शहर मंडळाच्या अध्यक्षपदी - संजय गंभीरे, अंबाजोगाई पश्चिम मंडळाच्या अध्यक्षपदी - गोकुळ कदम, तर केज पुर्व मंडळ अध्यक्षपदी - भगवान केदार, केज पश्चिम - संदिप पाटील, बालाघाट बीड - राणा डोईफोडे,



नेकनूर - अशोक रसाळ आदींच्या निवडी जाहिर झाल्या. यापैकी काही मंडळ अध्यक्ष उपस्थित झाल्यानंतर त्यांचा जेष्ठ नेते नंदकिशोर मुंदडा, युवा नेते अक्षय मुंदडा यांनी शाल, श्रीफळ, फेटा बांधुन सन्मान केला. बैठकीत मार्गदर्शन करताना भाजपा राज्य प्रवक्ते राम कुलकर्णी यांनी सांगितले की, आपण राज्यात नव्हे तर देशात सर्वात मोठ्या सदस्य संख्या असलेल्या पक्षाचे कार्यकर्ते असुन राज्यात दिड कोटी आपली सदस्य झाले ज्यासाठी सर्व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. बीड जिल्ह्यात नेत्या कॅबिनेट मंत्री ना.पंकजाताई, माजी खासदार डॉ.प्रितमताई आणि आमदार नमिताताई अक्षय मुंदडा यांच्या नेतृत्वाखाली काम करताना सदस्य नोंदणीत प्रत्येक कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. संघटनेत मिळालेली पदं खर्या अर्थाने चांगलं काम करण्यासाठी संधी असते. भाजपाचे संस्कार आणि विचार हा खर्या अर्थाने सामान्य जनतेमध्ये आपणच घेवुन जावु शकतो. ज्यांना पदं मिळाली त्यांनी आपल्यावर आलेली जबाबदारी आणि कर्तव्य भावनेतून निश्चित चांगले काम करायला हवे. मंडळ अध्यक्ष या नात्याने सर्वांना सोबत घेवुन काम तर करणे महत्वाचेच त्याहुन अधिक भाजपाचा अध्यक्ष हा जो सामान्य जनतेतला विश्वास तो टिकवण्यासाठी सर्वांग चौकटीत राहुनच काम करणे महत्वाचे. बीड जिल्ह्यात आपल्या नेतृत्वाने मोठ्या प्रमाणावर विकास कामे केली. केज विधानसभा मतदारसंघात देखील आमदारांनी प्रचंड विकासनिधी आणला. खर्या अर्थाने जनतेपर्यंत घेवून गेलं पाहिजे. केंद्र आणि राज्य सरकारच्या योजना तळागाळापर्यंत पोहोचविणे हे आपलंच काम असून नविन पदाधिकार्यांनी क्रियामान, क्रियाशीलता वाढवुन निष्ठेने काम केले तर आपलं नेतृत्व आणि संघटना बळकट झाल्याशिवाय रहात नाही हा सल्ला त्यांनी दिला. यावेळी केज बाजार समितीचे उपसभापती डॉ.वासुदेव नेहरकर, हिंदुलाल काकडे, ऍड.शरद इंगळे, महादू मस्के, पंडितराव जोगदंड, शंकर उबाळे, ॲड.शरदराव इंगळे, राणा चव्हाण, आण्णा सोनवणे, अनंत आरसुडे, सुभाष घुंडरे, बाबासाहेब शेळके, प्रशांत आदनाक, शिरीष मुकडे, गणेश रूद्राक्ष, सुनिल मस्के, गौरव लामतुरे, सत्यप्रेम इंगळे, मंदार काटे, महेश आंबड, माऊली वैद्य, विकास जाधव, शैलेष स्वामी, संतोष जिरे, दिपक कोरडे, सुनिल आडसुळ, संतोष शिनगारे, अभय केंद्रे, सोपान मोरे, योगेश कडबाने, दिपक सुरवसे, विलास काजगुंडे, राहुल कापसे, मयुर रणखांब, निकेश जगदाळे आदी मान्यवरांची उपस्थिती होती. या निवडींचे सर्वस्तरांतून स्वागत होत आहे.

# पुरंदर तालुक्यातील गावांचे 'सिटी सर्व्हे' रद्द करा; जिल्हा नियोजन बैठकीत आमदार विजय शिवतारे यांची मागणी

सासवड : पुरंदर तालुक्यातील अनेक गावांमध्ये मोजणी विभागाने सिटी सर्व्हे केलेले आहेत. हे सर्व्हे प्रचंड मोठ्या प्रमाणात चुकीचे केलेले असून गावागावातून नागरिकांच्या तक्रारी येत आहेत. लोकांच्या खाजगी जागांना देखील या विभागाने शासनाचे नाव लावलेले असून हे नाव कमी करण्यासाठी लोकांना प्रचंड मनःस्ताप सहन करावा लागत आहे. त्यामुळे एकतर संपूर्ण सर्व्हे रद्द करावा किंवा लोकांना त्रास न देता एकखिडकी योजना तयार करून ह्या दुरुस्त्या करून द्याव्यात अशी मागणी पुरंदर हवेलीचे आमदार विजय शिवतारे यांनी जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत केली आहे.



पुणे जिल्हा नियोजन समितीची बैठक विधान भवन पुणे येथे पार पडली. यावेळी बैठकीला जिल्ह्यातील आमदार खासदार, पुणे - पिंपरी चिंचवड शहरासह जिल्ह्यातील सर्व विभागांचे अधिकारी उपस्थित होते. शिवतारे म्हणाले की, गावागावात केलेल्या सिटी सर्व्हेमुळे कुठलाही फायदा न होता लोकांना नाहक त्रास सहन करावा लागला आहे. कुणाच्या जागा ग्राम पंचायत रेकॉर्डप्रमाणे लागलेल्या नाहीत तर कुणाच्या घराची नोंद होऊन अंगणाला सरकारचे नाव लागलेले आहे. यावर पालकमंत्री अजित पवार यांनी तत्काळ जमाबंदी आयुक्त सुहास दिवसे यांना याबाबत कार्यवाहीच्या सूचना दिल्या.

याशिवाय जिल्हा नियोजन बैठकीत पोलीस स्टेशन इमारतीसाठी जागा हस्तांतरण, नगरपालिका आवारात महात्मा फुले यांचा पूर्णाकृती पुतळा उभारणे आणि सासवड येथील बाजारासाठी दिवे गायरान क्षेत्रातील जागा हस्तांतरण करणे आदी विषयांवर देखील चर्चा झाली. यावेळी शिवतारे यांनी नव्याने अस्तित्वात आलेल्या फुरसुंगी उरुळी देवाची नगरपरिषदबाबत देखील महत्वाची मागणी केली.

शिवतारे म्हणाले की, नगरपरिषद अस्तित्वात आली असली तरी रस्ते, शासकीय इमारती आणि ॲमेनिटी स्पेस अशा मालमत्ता अद्याप नगरपालिकेला हस्तांतरित करण्यात आलेल्या नाहीत. याशिवाय टीपी स्कीम क्र ६, ९ आणि १० या देखील मनपाकडून नगरपरिषदेला द्याव्यात. यावर पालकमंत्री अजित पवार यांनी विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकारी यांना तत्काळ हस्तांतरण करावे अशा सूचना दिल्या आहेत.

तलाव ताब्यात घ्यावेत - शिवतारे

पुणे शहराच्या आजूबाजूच्या गावात जमिनींना सोन्याचे भाव आलेले आहेत. त्यामुळे प्लॉटींग व्यावसायिक तलाव, ओढे बुजवून त्यावर प्लॉट बनवून विकत असल्याचे प्रकार दिसून आले आहेत. त्यामुळे मनपाने हे जलस्त्रोत संपादन केले नसले तरी उच्च न्यायालयाच्या आदेशा नुसार तत्काळ ताब्यात घ्यावेत अशी मागणी शिवतारे यांनी केली. यावर महापालिका आयुक्तांनी ताबडतोब कार्यवाही करावी असे आदेश पालकमंत्र्यांनी दिले आहेत.

# पुरंदर विमानतळाबाबत मुरलीधर मोहोळांनी केले वक्तव्य; म्हणाले, पुणे आणि पश्चिम महाराष्ट्रासाठी


**पुणे । प्रतिनिधी**

**केंद्रीय नागरी वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ आज पुणे दौर्‍यावर होते. यावेळी त्यांनी पत्रकार परिषद घेतली. मुरलीधर मोहोळ यांनी अनेक गोष्टींवर भाष्य केले आहे. मुरलीधर मोहोळ यांनी पत्रकार परिषदेत देशभरातील विमानतळ, धावपट्टीचे विस्तारीकरण, उडान योजना याबद्दल माहिती दिली. जवळपास दीड करोड प्रवाशांनी उडान योजनेच्या माध्यमातून मागच्या अडीच वर्षात प्रवास केला, असल्याचे मंत्री मुरलीधर मोहोळ म्हणाले.**

केंद्रिय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ बोलताना म्हणाले, उडान योजनेमुळे देशामधला विमान प्रवास सामान्य नागरिकांच्या आवाक्यामध्ये आला आहे. देशामध्ये कोलकाता,चेन्नई अहमदाबादनंतर आज पुण्यामध्ये उडान यात्री कॅफेचा शुभारंभ झाला आहे. आता सर्वसामान्य माणसाच्या खिशाला परवडेल अशा दरामध्ये आता खाद्यपदार्थ या ठिकाणी मिळणार आहेत. मागच्या दहा वर्षांमध्ये देशातील विमान क्षेत्रात मोठी क्रांती झाली आहे.

देशात या आधी ७४ विमानतळ होते आता १६० झाले आहेत. २०४७ पर्यन्त देशात ४००० एअरपोर्ट असतील. पुण्यात नवीन टर्मिनल झाल्यानंतर प्रवाशांच्या संख्येत वाढ झाली आहे. पुरंदर विमानतळबाबत बोलायच झाले तर कुठेही विमानतळ करायचं असेल, तर जागाराज्य सरकार देत असते. एमआयडीसीच्या माध्यमातून ही जागा संपादित केली जाते, असे मुरलीधर मोहोळ म्हणाले.

पुढे बोलताना केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ म्हणाले, पुरंदरचे विमानतळ हे पुणे आणि पश्चिम महाराष्ट्राच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचे आहे. त्यामुळे भूमिपुत्रांवर कोणताही अन्याय केला जाणार नाही. पुणे शहर आणि अन्य गोष्टींवर देखील त्यांनी




भाष्य केले आहे. मुरलीधर मोहोळ म्हणाले, * पुण्याच्या विमानतळाचा विचार करताना पुढच्या पन्नास वर्षाचा विचार आम्ही करत आहोत. त्यामुळे २०० एकर पेक्षा जास्त जागा ताब्यात घेण्याचा आमचं नियोजन आहे. पुढच्या काळामध्ये अधिकची सेवा पुणेकरांना कशी देता येईल, याचा आम्ही विचार करत आहोत.पुण्यात आम्ही मेट्रोचे विस्तारीकरण करत आहोत. त्या दृष्टीने ती अधिक वाढवता येईल यासाठी यांचे प्रयत्न सुरू आहेत. खडकवासला ते खराडी मेट्रो मार्गासाठी देखील महामेट्रोचे अधिकारी यांच्याशी बैठक झाली आहे.




# पुणे विमानतळावरून प्रवास करणार्‍यांसाठी खास सोय! फक्त १० रुपयात चहा अन्

पुणे । प्रतिनिधी

हवाई प्रवास करताना योग्य दरात आणि गुणवत्तापूर्ण अन्नपदार्थ तेही स्वस्तात उपलब्ध व्हावेत. या उद्देशाने पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळावर आज ( दि २८) 'उडान यात्री कॅफे' या उपहारगृहाचा प्रारंभ करण्यात आला. नागरिक उड्डयन आणि सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या हस्ते या कॅफेचे उद्धाटन करण्यात आले. यावेळी विमानतळ संचालक संतोष ढोके व अन्य अधिकारी पदाधिकारी उपस्थित होते.

'उड़े देश का आम नागरिक' या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पानुसार आणि केंद्रीय नागरी हवाई वाहतूक मंत्री राम मोहन नायडू यांच्या नेतृत्वात 'उडान यात्री कॅफे' ही संकल्पना प्रत्यक्षात आणली गेली आहे. या कॅफेच्या माध्यमातून प्रवाशांना १० रुपयात पाणी आणि चहा, २० रुपयांत कॉफी, २० रुपयांत समोसा आणि २० रुपयांत मिठाई उपलब्ध होणार आहे. आजवर कोलकाता, अहमदाबाद आणि चेन्नई या विमानतळांवर ही सेवा सुरू करण्यात आली आहे. आता चौथे कॅफे पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळावर कार्यरत झाले आहे.

# पुण्यातील पोर्शे अपघातप्रकरणी मोठी अपडेट; अग्रवालला जामीन मंजूर

पुणे । प्रतिनिधी

कल्याणीनगरमधील हायप्रोफाईल पोर्शे अपघात प्रकरणात कारचालक अल्पवयीन मुलाच्या रक्ताचे नमुने बदलून पुरावे नष्ट केल्याप्रकरणी अटकेत असलेल्या शिवानी अग्रवालला सर्वोच्च न्यायालयाने अंतरिम जामीन मंजूर केला आहे. गेल्या दहा ते आकरा महिन्यांपासून याप्रकरणात १० आरोपी कारागृहात आहेत.



कल्याणीनगर परिसरात गेल्या वर्षी (१९ मे २०२४) भरधाव पोर्शे या आलिशान कारने दुचाकीस्वार संगणक अभियंता तरुण-तरुणीला धडक दिली होती. अपघातात दोघांचा जागीच मृत्यू झाला होता. याप्रकरणात येरवडा पोलिसांनी बांधकाम व्यावसायिक विशाल अग्रवालच्या अल्पवयीन मुलाला ताब्यात घेतले. अपघातापूर्वी अल्पवयीन मुलगा आणि त्याच्या मित्राने मुंढव्यातील एका पबमध्ये मद्यप्राशन केल्याचे निष्पन्न झाले होते. मुलाला ससून रुग्णालयात वैद्यकीय तपासणीस आणल्यानंतर मात्र, विशाल अग्रवाल, त्याची पत्नी शिवानी यांनी ससून रुग्णालयातील वैद्यकीय तज्ज्ञ डॉ. अजय तावरे, डॉ. श्रीहरी हाळनोर यांच्याशी संगनमत करून रक्ताचे नमुने बदलण्यात आले होते. त्यासाठी वैद्यकीय तज्ज्ञांना लाच दिल्याचा आरोप आहे. याप्रकरणी शिवानी अग्रवालला १ जून २०२४ रोजी अटक केली होती.

दरम्यान, सर्वोच्च न्यायालयात विशेष याचिकेमार्फत आपल्या अटकेच्या वैधतेला आव्हान दिले होते. सर्वोच्च न्यायालयाने या याचिकेवर सुनावणी देताना शिवानी अगरवालला अंतरिम जामीन मंजूर केला. तिच्या याचिकेवरील निकाल राखून ठेवण्यात आला आहे. अंतरिम जामिनाच्या अटी आणि शर्ती निश्चित करण्यासाठी तिने शिवाजीनगर जिल्हा सत्र सत्र न्यायालयात अर्ज केला. ड. अंगदसिंग गिल आणि ड. ध्वनी शहा यांनी बाजू मांडली.


न्यायालयाने घातल्या अटी

शिवानी हिने दर बुधवारी सकाळी अकरा ते दुपारी एक या वेळेत येरवडा पोलीस ठाण्यात हजर राहावे, तसेच मोबाइल सुरू ठेवावा. न्यायालयाच्या परवानगीशिवाय परदेशात जाऊ नये, साक्ष, पुराव्यात छेडछाड करू नये, जवळच्या नातेवाइकांचे पत्ते, मोबाइल क्रमांक न्यायालयात द्यावे, अशा अटी न्यायालयाने घालून दिल्या आहेत. एक लाख रुपयांच्या जातमुचलक्यावर अतिरिक्त सत्र न्यायाधीश के. एन. शिंदे यांनी जामीन मंजूर केला.

बडतर्फ सदस्यांकडून याचिका

कल्याणीनगर अपघात प्रकरणात अल्पवयीन मुलाला तीनशे शब्दांचा निबंध लिहिण्याच्या, तसेच वाहतूक पोलिसांबरोबर नियमन करण्याच्या अटींवर जामीन दिल्याप्रकरणी राज्य शासनाने बडतर्फ केलेल्या पुणे बाल न्याय मंडळातील दोन सदस्यांनी या निर्णयाविरोधात मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. न्यायालयाने याचिका दाखल करून शासनाला नोटीस बजावली आहे. बडतर्फ सदस्य डॉ. लक्ष्मण नेमा दानवडे आणि कविता तुळशीराम थोरात यांनी उच्च न्यायालयात दाद मागितली आहे. न्यायमूर्ती ए. एस. चांदूरकर आणि न्यायमूर्ती एम. एम. साठ्ये यांच्या खंडपीठाने राज्याच्या महिला आणि बाल विकास विभागाला नोटीस बजावली आहे. या प्रकरणी १८ जून रोजी पुढील सुनावणी होणार आहे.

# ठाकरेंच्या पक्षाला गळतीचे ग्रहण! आता 'या' नेत्यांनी केला शिवसेनेत प्रवेश



पिंपरी: (वा.) लोणावळ्यात ठाकरे गटाला मोठा धक्का बसला आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कार्यपद्धतीवर विश्वास ठेवून ज्येष्ठ माजी नगरसेविका कल्पनाताई आखाडे, नगरसेविका सिंधूताई परदेशी यांच्यासह उपशहरप्रमुख आणि विविध पदाधिकार्‍यांनी शिवसेनेत प्रवेश केला. शिवसेना उपनेते, मावळचे खासदार श्रीरंग बारणे यांनी सर्वांचे शिवबंधन बांधून पक्षात स्वागत केले. सर्वांना सन्मानाची वागणूक मिळेल अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली.

यावेळी शिवसेना महिला उपनेत्या सुलभा उबाळे, शिवसेना उपजिल्हाप्रमुख शरदराव हुलावळे, युवा सेना उपजिल्हाप्रमुख दत्ताभाऊ केदारी, शिवसेना मावळ तालुकाप्रमुख राजाभाऊ खांडभोर, युवासेना पुणे जिल्हा समन्वयक सागर पाचरणे, शिवसेना उप तालुका प्रमुख राम सावंत, शिवसेना लोणावळा शहर प्रमुख संजय भोईर, शिवसेना महिला लोणावळा शहर संघटिका मनीषाताई भांगरे, शिवसेना मावळ विधानसभा समन्वयक अंकुश देशमुख, शिवसेना उपशहर प्रमुख प्रकाश पाठारे, शिवसेना लोणावळा समन्वयक नंदू कडू, विशाल पाठारे उपस्थित होते.

ठाकरे गटाच्या ज्येष्ठ नगरसेविका कल्पनाताई आखाडे, नगरसेविका सिंधूताई परदेशी,उबाठा गटाचे लोणावळा उपशहरप्रमुख प्रकाश पाठारे, विजय खाडे, सह शहर संघटिका प्रियाताई पवार, विभाग संघटिका अनिताताई गायकवाड, विभाग संघटिका माग्रेट मुन्नास्वामी, विभाग प्रमुख मंगेश येवले, उपविभाग प्रमुख अनिल कालेकर, कल्पेश तिखे, दुर्वेश कडू, प्रणव तिकोने, संकेत जाधव, आदित्य शिंदे, दुर्वेश बोडके, प्रथमेश पाठारे यांच्यासह गंगाबाई हवालदार, अश्विनी सोपान पुनावडे, शुभम कदम, रोहित चिलवंत, सूरज भोईर, सागर दसवते, सौरभ गावडे, पियुष राजगुडे यांनी शिवसेनेते प्रवेश केला.

यावेळी बोलताना खासदार बारणे म्हणाले, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे नेहमी कार्यकर्त्यांसाठी उपलब्ध असतात. कार्यकर्त्यांना न्याय, ताकद देतात. त्यांच्या सुख, दुःखात सहभागी होतात. त्यामुळे त्यांच्या कार्यपद्धतीवर विश्वास ठेऊन ठाकरे गटाचे अनेक पदाधिकारी शिवसेनेत प्रवेश करत आहेत. शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेना बाळासाहेब ठाकरे यांचे विचार पुढे घेऊन जात आहे.

BEED PRARAMBH Newspaper Prin ed, Published and Owned by Jalinder Dnyandev Dhande and Printed at TULJABHAVANI PRINTERS, C/o Dnyandev Dhande, Sant Namdeo Nagar, Beed, Tq. Beed Dist.Beed Pin - 431122 (Maharashtra) and published at BEED PRARAMBH OFFICE, C/o Dnyandev Dhande, Sant Namdeo Nagar, Beed, Tq. Beed Dist.Beed Pin - 431122 (Maharashtra) Editor : Jalinder Dnyandev Dhande

बीड प्रारंभ हे पत्रक मुद्रक, प्रकाशक, मालक जालिंदर ज्ञानदेव धांडे यांनी तुळजाभवानी प्रिंटर्स, द्वारा - ज्ञानदेव धांडे, संत नामदेवनगर, बीड, ता.बीड जिल्हा - बीड पिन - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून बीड प्रारंभ कार्यालय, द्वारा - ज्ञानदेव धांडे, संत नामदेवनगर, बीड, ता.बीड जिल्हा - बीड पिन - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.संपादक : जालिंदर ज्ञानदेव धांडे






सायं.दैनिक बीड
# प्रारंभ
मंगळवार दि. २९ एप्रिल २०२५









# जगातील सर्वश्रेष्ठ राज्यघटना डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी भारत देशाला दिली - अॅड.तांदळे

## जयदत्त नगर रुई लिंबा येथील प्रलंबित विकास ना.पंकजाताई च्या माध्यमातून पूर्ण करू

**बीड । प्रतिनिधी**

दिनांक २८.०४.२०२५ वार सोमवार रोजी बीड तालुक्यातील रुई लिंबा या ठिकाणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली.या कार्यक्रमास भाजपा जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख,जिल्हा सरचिटणीस ड.सर्जेराव तात्या तांदळे,संघटन सरचिटणीस देविदास नागरगोजे सर,उपाध्यक्ष नवनाथ अण्णा शिराळे,शांतिनाथ डोरले आदि प्रमुख पाहुणे उपस्थित होते.

आपल्या मनोगतात ड.तांदळे म्हणाले की आज जो आपल्या देशाचा कारभार, कायदा,कानून चालत आहे तो फक्त डॉ.बाबासाहेब यांनी तयार केलेली राज्यघटना आणि पवित्र संविधान ह्या मुळे.आज समजातील सगळ्यात मागासलेला,गरीब, पिछाडलेला समाज याला मुख्य प्रवाहात आणण्याचे काम डॉ. बाबासाहेब यांनीच केले. आज त्यांच्यामुळे प्रत्येक समाजातील वर्गाला समान न्याय मिळाला. प्रत्येकाला शिक्षणाची नोकरीची संधी मिळाली. मागासलेल्या समाजामध्ये आज अशी अनेक उदाहरणे आहेत ज्यांनी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची प्रेरणा घेऊन, संविधानाने मिळवून दिलेल्या हक्कामुळे आयपीएस,आयएएस अशी उच्चपदे भूषवली आहे.पुढे बोलताना ड.तांदळे म्हणाले की,आपल्या जयदत्त नगर व बाकीच्या गावपरिसरातील जे काही विकासाचे प्रश्न प्रलंबित आहेत ते आपण ना.पंकजाताई च्या माध्यमातून शंभर ▶▶ पान २ वर...



# आंबेडकरांनी भारतीयांना लोकशाही बहाल केली: पप्पू कागदे



बीड । प्रतिनिधी

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी देशभर होणाऱ्या शोषण मुक्तीसाठी लढा उभारून शोषत, पिडीत उपेक्षीत समाज बांधवांना मुख्य प्रकलत आणण्यासाठी त्याचे हक्क व अधिकार मिळवून देण्यासाठी भारतीय संविधानाची निर्मीती करून प्रत्येकांना स्वतंत्रपणे जगण्याचा अधिकार मिळवून दिला. हजारो वर्षांची गुलामगीरी नष्ट करून उपेक्षीतांना ताठ मानेने उभे करण्यासाठी भारतीय संविधान देशाला देवून लोकशाही बहाल केली. असे प्रतिपादन युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइंचे बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या १३४ व्या जयंती प्रसंगी, शिवणी, खांडवी, सांडरवण, घाटजवळा, आहेर वडगांव या गांवी केले.

पुढे बोलतांना कागदे म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय संविधानाच्या माध्यमातून महीलांचे सक्षमीकरण-करण्यासाठी हिंदु कोड बील मंजूर करून त्यांना त्याचे हक्क व अधिकार दिले. आणि अशिक्षीत समाज घटकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शिक्षण मोफत व सक्तीचे करुन शिक्षणाची दारे खुली केली. एक व्यक्ती एक मताचा अधिकार देवून मतदारराजा बनविले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी वर्ग, जात, धर्म, लिंग असा भेदभाव न करता भारताला संविधान देवून सक्षम लोकशाही बहाल केली. यावेळ पूज्य भिख्कु धम्मशिल थेरो, ▶▶ पान २ वर...



पिंपळगाव तालुका केज येथे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून श्री शरद शामराव गदळे युवक नेतृत्व प्रमुख उपस्थिती सिद्धार्थ वाघमारे अध्यक्ष, भागवत वाघमारे माणिक वाघमारे डॉक्टर संपत वाघमारे गौतम वाघमारे राहुल वाघमारे विजय वाघमारे आत्माराम वाघमारे प्रतीक वाघमारे विकास वाघमारे अमित वाघमारे ऋषिकेश वाघमारे रोहन वाघमारे रोहित वाघमारे संदेश वाघमारे योगेश वाघमारे आणि गावातील प्रतिष्ठित नागरिक......... छाया तात्यासाहेब डोईफोडे

# छत्रपती संभाजी महाराज सार्वजनिक जयंती उत्सव समिती बीड शहर ची कार्यकारिणी जाहीर

बीड । प्रतिनिधी

सविस्तर वृत्त असे की छत्रपती संभाजी महाराज जयंती उत्सव समिती बीड शहर समितीचे कार्यकारणी जाहीर करण्यासाठी दिनांक २८ ४ २०२५ रोजी शासकीय विश्राम गृह बीड येथे रवि वडमारे यांच्या मार्गदर्शनाखाली बोलण्यात आलेल्या बैठकीत कार्यकारणी जाहीर करण्यात आली. या बैठकीसाठी प्रवीण पालीमकर सर प्रा.सनी वाघमारे महेश धांडे आकाश कंडरे भारत कांबळे सनी चांदणे स्वप्निल शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये कार्यकारणी जाहीर करण्यात आली. अध्यक्षपदी अजय शिरसाठ उपाध्यक्ष विनीत थोरात, सचिव अविनाश वडमारे, सहसचिव महेश झेंडे

वरील मान्यवर मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन अभय इंगोले यांनी केले. तर उत्सव समितीचे प्रमुख रवी वडमारे यांनी आभार प्रदर्शन केले. या बैठकीसाठी शहरातील युवकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शवली होती.

# दहा दिवशीय श्रामणेर शिबिराचे आयोजन; नाव नोंदणी करण्याचे आवाहन: भिक्खु धम्मशिल थेरो

**बीड । प्रतिनिधी**

तथागत सिध्दार्थ गौतम बुद्ध आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंती निमित्ताने दहा दिवशीय श्रामणेर शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. सदरील शिबिर बीड तालुक्यातील शिवणी येथील महाविहार धम्मभूमी डॉ.भदन्त आनंद कौसल्यायन नगर, येथे शुक्रवार दि.२ ते १२ मे या कालावधीत होत आहे. प्रियदर्शी धम्म संस्कार शिक्षण संस्था बीडकडून आयोजित शिबिरात नाव नोंदणीसाठी १५ वर्षावरील मुलांनी आपले नाव नोंदवून प्रवेश निश्चित करावा असे आवाहन मुख्य संयोजक भिक्खु धम्मशिल थेरो यांनी केले आहे.



प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हंटले आहे की, सध्या मुलांच्या शाळेला सुट्ट्या लागल्या आहेत. हा सुट्ट्यांचा काळ आपल्या लहान तरुण मुलांना त्यांच्या मनावर सुसंस्कार होण्याकरिता महत्त्वाचा ठरतो. त्यामुळे मुलांना सदर शिबिरात सहभागी करावे. त्यासाठी पंधरा वर्षावरील मुलांनी आपले नाव नोंदवून प्रवेश निश्चित करावा. असे आवाहन प्रियदर्शी धम्म संस्कार शिक्षण संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.

यांना नोंदणीसाठी संपर्क

श्रामणेर शिबिराचे मुख्य संयोजक भिक्खु धम्मशिल थेरो यांच्या संयोजनात शिबिर होत असून नाव नोंदणीसाठी भास्कर सरपते ७३८७१४९२२३,अलका डोंगरे ९०२१७८६३३१, उद्धव खरात ९९२१७८०५५५, राणू डोळस ९७३०२६१२२१, वंदना वाघमारे ९२८४९७६८१९, प्रदिप घाडगे ७०२०५९१९८१, सुरेश डोळस ९७६४४८७०६८, पंडित चव्हाण ७५८८९३२७९६ यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

# भारतरत्न डॉ.आंबेडकर यांनच्या जयंती निमित्त भगवान बाबा प्रतिष्ठान येथे सन्हभोजन कार्यक्रम संपन्न

बीड। प्रतिनिधी

श्री.संत भगवान बाबा सामाजिक प्रतिष्ठान येथे १४ एप्रिल रोजी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती विविध सामाजिक कार्यक्रम व उपक्रम राबवून मोठया उत्साहात साजरी करण्यात आली.

यावेळी शहरातील प्रति वर्ष प्रमाणे याही वर्षी शहरातील नेते मंडळी,पत्रकार,व्यापारी तसेच मित्रपरिवार यानी उपस्थित राहुन प्रथम डॉ.आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून सामूहिक वंदना घेत अभिवादन केले. भगवान बाबा येथील नागरिकांनी बॅनर सह,डिजे सह ईतर व्यर्थ खर्च टाळत स्नेहभोजनचा कार्यक्रम करण्याचा निर्णय घेत,सामाजिक एकोपे चे दर्शन घडवले.या कार्यक्रमात



## बॅनरसह इतर व्यर्थ होणारा खर्च न करता अन्नदान करावे -वीर

लहानथोर मंडळी सह महिलांनची उपस्थित लक्षणीय होती.

डॉ. आंबेडकर यानंच्या जयंती निमित्त स्नेहभोजन कार्यक्रमाचे हे चौथे वर्ष असून, यापुढे ही प्रत्येक वर्षी स्नेहभोजन सह सामाजिक उपक्रम राबवून अभिवाद करण्यात येणार आल्याची माहिती वीर यांनी दिली.

यावेळी प्रमुख उपस्थिती शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल दादा जगताप,दैनिक पार्श्वभूमीचे संपादक गंमत भंडारी,रिपाई जिल्हाध्यक्ष मायाताई मीसळे,ड.राजेश शिंदे,झडख पान पाटील साहेब,ड.राजेंद्र कोरडे, प्रा.अरूण मुंडे सर होते.या कार्यक्रमाचे आयोजक प्रा.टाकणखार, महेंद्र वाघमारे साहेब,प्रा.राजू कोरडे,सुलाखे सर, साहेब,विलास भाऊ कोरडे,केचळे सर,वायबसे साहेब,ऍड.लघाणे,निलेश गलधर,राजू डोळस सौरभ बन्सोडे,सौरभ मुंडे,पिंटू मिसळे,अशोक गायकवाड साहेब,सुंदर भिसे,सचिन कांबळे,सुधीर हजारे, सुदर्शन काळे,समर्थ दळवी,आनंद वीर सह नागरिकानी व महिलांनी स्नेहभोजनाचा लाभ घेतला.

# मानव धर्म उन्नतीसाठी हरिनाम सप्ताहाचे योगदान -राजेंद्र मस्के

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र ही संतांची भूमी संतानी आचार विचारातुन मानवतेचा खरा संदेश दिला. संताचं जीवन मानवतेसाठी आदर्श जीवन आहे. त्याच्या विचारांतून मानवाला जीवन जगण्याची दिशा, प्रेम भावना, सहिष्णुता, आणि सद् ? चारित्र्याची प्रेरणा मिळते. संतांचे विचार मोठ्या प्रमाणात प्रसारित झाले पाहिजे.

अखंड हरिनाम सप्ताहातुन संत विचाराची उधळण होते.

मानव धर्म उन्नतीसाठी खऱ्या अर्थाने प्रेरणा मिळते. संतांचे विचार प्रत्येकाने आत्मसात केले पाहिजे, असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस



## मांडवजाळी येथे अखंड हरिनाम सप्ताह सांगता

शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी बीड तालुक्यातील मांडव जाळी येथील हभप शहादेव महाराज शास्त्री यांच्या मार्गदर्शनातील अखंड हरिनाम सप्ताह सांगता प्रसंगी उपस्थित भाविक भक्तांना केले.

हभप शहादेव महाराज शास्त्री यांनी मांडवजाळी परिसरात सुरू केलेले अध्यात्माचे कार्य प्रेरणादायी आहे. अध्यात्मा बरोबरच परिसरातील लोकांना मार्गदर्शन, व्यसनमुक्तीचा संदेश, लोकांना बरोबर घेऊन विकास कामांसाठी त्यांचे प्रयत्न चालू असतात. त्यांच्यामुळेच येथे सार्वजनिक सभामंडप बांधून देण्याची सेवा माझ्या हातून घडली. प्रत्येक गाव खेड्यात अध्यात्म आणि विकास बरोबरीने चालला तर नक्कीच तेथील ग्राम जीवन समृद्ध होईल. असा विश्वास व्यक्त केला.हरिनाम सप्ताह सांगता प्रसंगी मांडवजाळी व परिसरातील महिला पुरुष बहुसंख्येने उपस्थित होते.

# ज्या घरात संपत्ती,दया आहे तेथे लक्ष्मी राहते -ह.भ.प.एकनाथ महाराज

**आष्टी । प्रतिनिधी**

मिळालेल्या देहाचा सदुपयोग करा दुरुपयोग करू नका. देहाचा उपयोग उपभोगाकरिता केला तर मोठी हानी होते. पापाचा पैसा खाण्यासाठी पूर्ण गाव येते पण फेडण्याकरता स्वतःला जावे लागते त्यामुळे पाप करू नका.भगवान देता है तो छप्पर फाडके देता है और लेता है तो चमडी फाड कर लेता है.ज्या घरात संपत्ती आणि दया आहे त्याठिकाणी लक्ष्मी राहते. त्या घरमालकाने लक्ष्मीला बाहेर काढण्याचा प्रयत्न केला तरी लक्ष्मी बाहेर जात नाही.देवाचा प्रसाद मिळाल्यानंतर जीवनात दुःखाचा लवलेश शिल्लक राहत नाही.ज्यांनी शिवस्वरूप बाबांची प्रामाणिक सेवा केली त्यालाच काल्याच्या प्रसादाचा अधिकार आहे.प्रत्येक क्षेत्रामधील प्रत्येकाला वाटते की आपल्या क्षेत्रामध्ये पूर्णतः व्हावी पण तसे होत नाही. उदा,समुद्रामध्ये




बारा महिने पाऊस पडला आणि सर्व नद्या समुद्राला मिळाल्या तरीही समुद्र भरत नाही आणि त्याच्या उलट बारा महिने पाऊस पडला नाही तरी पण समुद्रातील पाणी दोन इंच पण कमी होत नाही. देवाने दिलेल्या देहाचा सदपयोग कसा करावा हे संत संगतीत आल्या शिवाय कळत नाही.चोऱ्या कशा कराव्या हे पुढाऱ्यांना विचारा आणि जीवनाचे कल्याण कसे करावे हे साधू संताला विचारा देहाचा दुरुपयोग करू नका. माणसाने केलेल्या हत्येची परतफेड करावी लागते.देवाने श्रीमंती दिली पण दान केले नाही तर काय होते तर आता जे घाटावर भीक मागतात ते पूर्वी श्रीमंत होते त्यांनी कधी उष्ट्या हाताने कावळा हाणला नाही ते असतात.ग्रहस्थी माणसाच्या दारातून एखाद्या याचक विन्मुख गेला तर त्या याचकाचे काही होत नाही पण घर मालकाचे मागील पुण्य संपते.धाब्याचा काळ आला आणि अतिथी धर्म बुडाला घरचे माणसेच घरी जेवत नाहीत तर अतिथीला कुठून जेवण देणार ? असा प्रश्न उपस्थित करीत ज्या घरात संपत्ती, दया आहे तेथे लक्ष्मी राहते त्या घरमालकाने लक्ष्मीला बाहेर काढण्याचा प्रयत्न केला तरी लक्ष्मी बाहेर जात नाही असे प्रतिपादन ह.भ.प. एकनाथ महाराज चत्तर शास्त्री यांनी केले.

आष्टी तालुक्यातील श्री क्षेत्र कासारी येथे संत शिवस्वरूप बन महाराज संजीवन समाधी सोहळ्या निमित्त दि.१९ ते २६ एप्रिल २०२५ या कालावधीत आयोजित अखंड हरिनाम सप्ताहात काल्याच्या कीर्तनात ते बोलत होते. ह.भ.प.चतर शास्त्री बोलताना पुढे म्हणाले की, फुकट देणे हे भगवद्ग गीतेच्या विरोधात आहे.ज्ञानेश्वर महाराज सांगतात जी माणसे आपल्या पोटापुरते काम करत नाहीत ते देवाच्या दर्शनासाठी सुद्धा योग्य नाहीत. शासनाने फुकटचे काही देऊ नये, द्यायचेच असेल तर शेतीमालाला हमीभाव द्या सेंद्रिय औषध आणि खताचा टॅक्स कमी करा तरुणांच्या हाताला काम द्या.ज्यांनी शिवस्वरूप बाबांची प्रामाणिक सेवा केली त्यालाच काल्याच्या प्रसादाचा अधिकार आहे. प्रत्येक क्षेत्रामधील प्रत्येकाला वाटते की आपल्या क्षेत्रामध्ये पूर्णतः व्हावी पण तसे होत नाही. उदा,समुद्रामध्ये बारा महिने पाऊस पडला आणि सर्व नद्या समुद्राला मिळाल्या तरीही समुद्र भरत नाही आणि त्याच्या उलट बारा महिने पाऊस पडला नाही तरी पण समुद्रातील पाणी दोन इंच पण कमी होत नाही. देवाने दिलेल्या देहाचा सद उपयोग कसा करावा हे संत संगतीत बसल्याशिवाय कळत नाही.चोऱ्या कशा कराव्या हे पुढाऱ्याला विचारा आणि जीवनाचे कल्याण कसे करावे हे साधूला विचारा देहाचा दुरुपयोग करू नका. माणसाने केलेलया हत्येची परतफेड करावी लागते.देवाने श्रीमंती दिली पण दान केले नाही तर काय होते तर आता जे घाटावर भीक मागतात ते पूर्वी श्रीमंत होते त्यांनी कधी उष्ट्या हाताने ▶▶ पान २ वर...

# परळी गंगाखेड राष्ट्रीय महामार्गाचे काम त्वरित पूर्ण करा-अँड.मनोज संकाये

## उपजिल्हाधिकारी यांना मित्र मंडळाच्या वतीने निवेदन सादर | अन्यथा राष्ट्रीय महामार्गावर महाराष्ट्र दिनी धरणे आंदोलन करण्याचा इशारा!

परळी । प्रतिनिधी

गेल्या तीन वर्षापासून परळी गंगाखेड राष्ट्रीय महामार्गाचे रखडलेले काम आज तागायत पूर्ण झाले नसून याला जबाबदार राष्ट्रीय महामार्गाचे संबंधित गुत्तेदार आणि अधिकारी हे जबाबदार आहेत याचा फटका प्रवाशांना बसत आहे. वाहतूक कोंडी निर्माण होऊन या मार्गावर अनेक अपघाताच्या घटना घडल्या आहेत त्यामुळे या महामार्गाचे रखडलेले काम त्वरित पूर्ण करा



तसेच परळीतील डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी उड्डाण पुलावरील वळणावरची संरक्षण भिंत त्वरित बांधा या मागणीसाठी मित्र मंडळाच्या वतीने परळी येथील उपजिल्हाधिकारी कार्यालयात उपजिल्हाधिकारी माननीय लाटकर साहेब यांना निवेदन दिले. यात त्यांनी विविध मागण्या केल्या आहेत. मागण्या मान्य न झाल्यास महाराष्ट्र दिनी परळी गंगाखेड राष्ट्रीय महामार्गावर मित्र मंडळाच्या वतीने धरणे आंदोलन केले जातील असा इशारा त्यांनी दिला.

निवेदनात म्हटले आहे की, परळी गंगाखेड राष्ट्रीय महामार्ग याचे काम संबंधित गुत्तेदाराकडून सुरू असून ते आज पर्यंत अपूर्ण आहे. संबंधित गुत्तेदार अतिशय निष्काळजी पणाने या मार्गाचे काम करत आहेत.

औष्णिक विद्युत केंद्राचे जुने भांडार ते धर्मापुरी फाट्यापर्यंत पुलाचे आणि मार्गाचे काम अर्धवट रखडलेले आहे. त्यामुळे येथे वाहतूक कोंडी निर्माण होऊन असंख्य अपघात घडण्याचा धोका निर्माण झाला आहे आणि याच ठिकाणी अपघात घडले आहेत त्यामुळे प्रवाशांना आणि वाहनधारकांना स्वतःचा जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. त्याचबरोबर परळी शहरातील डॉ.श्यामाप्रसाद मुखर्जी उडान पुलावरील वळणावर संरक्षण भिंत पडल्याने तेथे दोघांचा मृत्यू झाल्याची घटना गेल्या दोन ते तीन महिन्यापूर्वी घडली आहे याबाबत अधिकाऱ्यांची संपर्क साधला असता त्यांच्याकडून समाधानकारक उत्तर मिळत नाही. संरक्षण भिंत पडल्याने तीस ते चाळीस फूट वाहन खाली कोसळण्याची दाट शक्यता आहे त्याचबरोबर परळी राष्ट्रीय महामार्गावरील चेंबरी विश्रामगृहा जवळील पुलावरील झाडे झुडपे, मोठ्या प्रमाणावर वाढलेली आहेत त्यामुळे वळणावर समोरचे वाहन दिसत नाही तेथेही अपघात होण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे त्यामुळे तेथील झाडे झुडपे तोडून घ्यावीत त्याच ठिकाणी रोलिंग व कठडे पडल्याने अपघात होत आहेत ▶▶ पान २ वर...

# बुधवारी इंद्रप्रस्थ कॉलनीत ह.भ.प. माधव महाराज डाके यांचे हरीकिर्तन

बीड । प्रतिनिधी

श्रीसंत भगवानबाबा व श्रीसंत वामनभाऊ महाराज प्रतिष्ठान इंद्रप्रस्थ कॉलनी बीड येथे गेल्या १३ वर्षापासुन दरवर्षी अखंड त्रिदिवशीय हरीनाम सोहळ्याचे आयोजन करण्यात येते याही वर्षी मुर्ति प्राणप्रतिष्ठा वर्धापन दिनानिमित्त ३० एप्रील ते २ मे २०२५या कालावधीत अखंड त्रिदिवशीय हरीनाम सोहळ्याचे आयोजन केले आहे या सोहळ्यात दि३० एप्रिल बुधवार रोजी रात्री ८:३० वा प्रसिद्ध किर्तनकार ह.भ.प. माधव महाराज डाके (काठवडेकर) यांचे सुश्राव्य किर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे तरी याकिर्तनाचा लाभ शहारातील परीसरातील सर्व भाविक भक्तांनी घ्यावा असे आवाहन या कार्यक्रमाचे आयोजक श्रीसंत भगवानबाबा व श्रीसंत वामनभाऊ प्रतिष्ठान इंद्रप्रस्थ कॉलनी बीडचे अध्यक्ष डॉ राजेंद्र भाऊ सानप यांनी व त्यांच्या सर्व सहकारी भाविक भक्त यांनी केले.

